Date

# अनुभव

०८-१०-2022

जगत असतांना जीवन,
नवे नवे अनुभव येतात.
साठवणं आपल्या संग्रही,
प्रसंगी तेच कामी येतात. -१-

आधार असतो अनुभवांचा,
पदोपदी जगत असतांना.
उभे दिपस्तंभ अनुभवांचे,
मार्ग दाखविती जगतांना. -2-

शिकत नसतात कधिही,
जरा काही स्वानुभवाने.
जगत असतात सारे
याच्या त्याच्या मदतीने. -3-

नुसते वय वाढत जाते,
उन्हाळे पावसाळे पाहून.
ज्ञान अनुभवांचे कधिच,
नसते वयावर विसंबून. -४-

नसते ज्यांना शिकायचे,
अशांना सांगत बसू नये.
ही माणसे गतानुगतिक,
बुध्दिभेद आपला करू नये. -५-

सुभाष
(महाराष्ट्र)